पुढारी दिनांक :- 16/02/2021

# जखमीसाठी देवदूत बनले पोलिस

**अर्धापूर, पुढारी वृत्तसेवा :** नांदेड- नागपूर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या ट्रक - दुचाकी अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला होता. या दुचाकीस्वारास वसमतफाटा महामार्ग पोलिस पथकाचे पोलिस निरीक्षक अरुण केंद्रे यांनी स्वतः तत्काळ जखमीला उपचारासाठी हालवून मदत केली होती. त्यामुळे जखमीचा जीव वाचला. या घटनेची माहिती गृहमंत्री अनिल देशमुख यांना मिळाल्यानंतर त्यांनी या संदर्भात फोटो ट्विटरवर शेअर करून या कार्याची दखल घेतली.

नांदेड अर्धापूर - नागपूर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर वसमतफाटा येथे महामार्ग पोलिस सुरक्षा पथक आहे. या पथकाव्दारे जखमींना मदन करणे, उपचारासाठी रुग्णालयात दाखल करणे , वाहतूक सुरळीत करणे , वाहतुकीला शिस्त लावणे, अपघात प्रवन भागात सूचना फलक लावणे आदी कामे केली जातात. तसेच अपघातग्रस्तांना तत्काळ मदत करणे हे प्राथमिक व महत्त्वाची जबाबदारी या पथकावर आहे. पोलिस, सैन्यात वर्दीला विशेष असे महत्त्व आहे. वर्दीचा सन्मान केला जातो तसेच अधिकारी व कर्मचारी वर्दीचे पावित्र्य राखत असतात.

अर्धापूर नांदेड रस्त्यावर नांदेडकडून नागपूरकडे जाणाऱ्या ट्रकने वसमतफाटा चौकशीजवळ ( आर जे ११ जी बी २१२७ ) दुचाकीस्वारास ( एम एच २६ बी एस ४१७५ ) जबर धडक दिली . या अपघातात दुचाकीस्वार माधव नरसिंहराव चिकारकर ( वय ४२ ) जखमी झाला . त्यांना उपचारासाठी तातडीने हलविणे आवश्यक होते. अशा परिस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांची वाट न पाहता पोलिस निरीक्षक अरुण केंद्रे अपघातस्थळी धावून गेले व जखमीला स्वतः उचलून रुग्णवाहिकेत ठेवले व रुग्णवाहिकेला तातडीने रवाना केले.

जखमीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. या घटनेची छायाचित्रे प्रसारमाध्यमातून प्रसारित झाले. या घटनेची दखल गृहमंत्री अनिल देशमुख यांनी घेतली असून त्यांनी ट्विटरवर पोलिस अधिकाऱ्यांचे छायाचित्रे शेअर करून महामार्ग पोलिसांच्या कामाचे कौतुक केले.